शिक्षण मंडळ कराड, संचालित

# महिला महाविद्यालय कराड

## अर्थशास्त्र विभाग

## बहुपर्यायी प्रश्न

विषय - स्थूल/समग्रलक्षी अर्थशास्त्र पेपर I

बी.कॉम भाग - II सेम - III

1) समग्रलक्षी अर्थशास्त्र हे व्यक्तिगत घटकांचा अभ्यास करीत नाही तर मोठ्या समुच्यात्मक बाबींचा अभ्यास करते हे...........यांचे विधान आहे.

अ) प्रा. बोल्डिंग ब) अँडम स्मिथ क) एच रॉबर्टसन ड) जे.एम केन्स

2) स्थूल अर्थशास्त्रात...........घटकांचा समग्र पातळीवर अभ्यास केला जातो.

अ) लहान ब) मोठ्या क) अति लहान ड) अति मोठ्या

3) ज्या अर्थशास्त्राच्या शाखेत मोठ्या समुच्यात्मक घटकांचा अभ्यास केला जातो ती अर्थशास्त्राची शाखा म्हणजे..........होय.

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) स्थूल अर्थशास्त्र क) विकासाचे अर्थशास्त्र ड) श्रमाचे अर्थशास्त्र

4) एका वर्षाच्या कालावधीत देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवा यांचे पैशात काढलेले मूल्य म्हणजे........ होय.

अ) स्थूल देशांतर्गत उत्पादन ब) निव्वळ राष्ट्रीय उत्पादन क) स्थूल राष्ट्रीय उत्पादन ड) स्थूल दरडोई उत्पन्न

5) ..............वरून संपूर्ण अर्थव्यवस्थेची कल्पना येते.

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) स्थूल अर्थशास्त्र क) विकासाचे अर्थशास्त्र ड) श्रमाचे अर्थशास्त्र

6) देशातील विविध आर्थिक समस्यांचे आकलन होण्यासाठी समग्रलक्षी अर्थशास्त्र उपयुक्त ठरते.

अ) सूक्ष्म अर्थशास्त्र ब) समग्रलक्षी अर्थशास्त्र क) विकासाचे अर्थशास्त्र ड) श्रमाचे अर्थशास्त्र

7) ठराविक कालखंडात देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवांचे केलेले मापन म्हणजे..........होय.

अ) दरडोई उत्पन्न ब) राष्ट्रीय उत्पन्न क) व्यक्तिगत उत्पन्न ड) सार्वजनिक उत्पन्न

8) स्थूल देशांतर्गत उत्पन्न = देशात उत्पादित झालेल्या वस्तू व सेवा +......................

अ) निर्यात - आयात ब) आयात - निर्यात क) निर्यात+आयात ड) आयात + निर्यात

9) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन............ वर्षांनी केले जाते.

अ) पाच  ब) तीन  क) एक  ड) चार

10) ...........पद्धतीनुसार राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करताना देशातील व्यक्ती व संस्था यांनी प्राप्त केलेल्या निव्वळ उत्पन्नाची बेरीज करून राष्ट्रीय उत्पन्नाची मापन केले जाते.
अ) उत्पन्न  ब) उत्पादन  क) खर्च  ड) वरीलपैकी सर्व

11) राष्ट्रीय उत्पन्न हे नेहमी.........स्वरूपात व्यक्त केले जाते.
अ) वस्तुच्या  ब) पैशाच्या  क) आकडेवारीच्या  ड) वरीलपैकी सर्व

12) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप करताना........... वस्तू व सेवांचे मूल्य विचारात घेतले जाते.
अ) अंतिम  ब) प्राथमिक  क) अंतःस्थ  ड) दुय्यम

13) स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातून घसारा वजा केला असता जे उत्पन्न मिळते त्यास.............असे म्हणतात.
अ) निव्वळ दरडोई उत्पन्न  ब) निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न  क) निव्वळ व्यक्तिगत उत्पन्न  ड) निव्वळ सार्वजनिक उत्पन्न

14) राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करण्यासाठी पुढील पद्धतींचा उपयोग केला जातो.
अ) उत्पादन  ब) उत्पन्न  क) खर्च  ड) वरीलपैकी सर्व

15) राष्ट्रीय उत्पन्नाच्या आकडेवारीचा उपयोग कशासाठी केला जातो.
अ) आर्थिक नियोजनासाठी  ब) आर्थिक विकासाचे मापन करण्यासाठी  क) उत्पन्नांच्या विभाजनाचा अभ्यास करण्यासाठी  ड) वरीलपैकी सर्व

16) व्यक्तीला मिळणाऱ्या उत्पन्नाचा जो भाग त्याला प्रत्यक्षात खर्च करता येतो त्यास........... असे म्हणतात.
अ) दरडोई उत्पन्न  ब) व्ययशक्य उत्पन्न  क) व्यक्तिगत उत्पन्न  ड) राष्ट्रीय उत्पन्न

17) ............चे मापन करताना अचूक आकडेवारी मिळण्याची अडचण निर्माण होते.
अ) दरडोई उत्पन्न  ब) व्ययशक्य उत्पन्न  क) व्यक्तिगत उत्पन्न  ड) राष्ट्रीय उत्पन्न

18) पैशामध्ये जी.......शक्ती असते तिला पैशाचे मूल्य असे म्हणतात.
अ) खरेदी  ब) विनिमय  क) व्यवहार  ड) वरीलपैकी सर्व

19) पैशाचे मूल्य.................वर अवलंबून असते.
अ) पैशाच्या मागणी  ब) पैशाच्या पुरवठ्यावर  क) पैशाच्या खरेदी शक्ती।  ड) पैशाच्या संख्या

20) चलनसंख्यामान सिद्धांतानुसार पैशाचे मूल्य हे पैशाच्या………….. निश्चित होते.
अ) पैशाच्या मागणीवरून ब) पैशाचा पुरवठा वरून क) पैशाच्या संख्येवरून ड) पैशाच्या क्रयशक्ती वरून

21) पैशाचे मूल्य कमी होऊन किंमत पातळी वाढते अशी अवस्था म्हणजे……….होय.
अ) चलनवाढ ब) भाववाढ क) चलन विस्तार ड) वरीलपैकी सर्व

22) पैशाचा व्यवहार दृष्टीकोण सिद्धांत कोणी मांडला आहे ?
अ) आयर्व्हिंग फिशर ब) अँडम स्मिथ क) एच रॉबर्टसन ड) जे.एम केन्स

23) रोख शिल्लक दृष्टीकोणानुसार पैशाचे मूल्य हे……….. ठरते.
अ) पैशाच्या मागणीवरून ब) पैशाचा पुरवठा वरून क) पैशाच्या संख्येवरून ड) पैशाच्या क्रयशक्ती वरून

24) चलनवाढ पुढील कारणांमुळे घडून येते.
अ) पैशाच्या पुरवठ्यातील वाढ ब) पत पैशातील वाढ क) पैशाच्या संख्येतील वाढ ड) वरील सर्व

25) व्यापारी बँकांनी पत निर्मिती मोठ्या प्रमाणात केल्यामुळे जी चलनवाढ होते तिला………..असे म्हणतात.
अ) तूट प्रेरित चलनवाढ ब) पतनिर्मिती चलनवाढ क) नफा निर्मित चलनवाढ ड) वरीलपैकी एकही नाही

26) चलनवाढ नियंत्रित करण्यासाठी सरकारकडून पुढील उपाय योजना किंवा धोरणांचा वापर केला जातो.
अ) चलन विषयक धोरण ब) राजकोषीय धोरण क) किंमत नियंत्रण ड) वरीलपैकी सर्व

27) पैशाच्या मूल्यामध्ये झालेले सापेक्ष बदल मोजण्याचे साधन म्हणजे हे……….……..होय.
अ) किंमत निर्देशांक ब) वेतन निर्देशांक क) रोजगार निर्देशांक ड) उत्पादन निर्देशांक

28) जे एम. केन्स यांच्यामते………. च्या कमतरतेमुळे अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगाराची पातळी दिसून येते.
अ) एकूण मागणी ब) प्रभावी मागणी क) एकूण पुरवठा ड) प्रभावी पुरवठा

29) जे. एम केन्स यांच्या मते रोजगार पातळी ही………..वरून ठरते.
अ) एकूण मागणी ब) प्रभावी मागणी क) एकूण पुरवठा ड) प्रभावी पुरवठा

30) …………..च्या मते प्रत्येक पुरवठा हा आपली मागणी निर्माण करीत असतो.

अ) जे. बी. से       ब) अँडम स्मिथ       क) एच रॉबर्टसन       ड) जे.एम केन्स

31) केन्स यांच्या मते प्रभाव मागणीची निश्चिती व रोजगार पातळी चा समतोल………… घटकामुळे होतो.

अ) एकूण मागणी    ब) प्रभावी मागणी   क) एकूण पुरवठा    ड) एकूण मागणी व एकूण पुरवठा

32) केन्स यांच्यामते उत्पन्नातील वाढीबरोबर उपभोगातही वाढ होत जाते मात्र उत्पन्नातील वाढीच्या तुलनेत उपभोगातील वाढ……... असते.

अ) जास्त    ब) कमी   क) धनात्मक    ड) ऋणात्मक

33) गुंतवणूक गुणकाची संकल्पना पुढीलपैकी कोणी मांडली ?

अ) जे. बी. से       ब) अँडम स्मिथ       क) एच रॉबर्टसन       ड) जे.एम केन्स

34) ……...च्या साहयाने गुंतवणुकीतील वाढ आणि उत्पन्नातील वाढ यांच्यातील संबंध स्पष्ट केला जातो.

अ) किंमत गुणक    ब) गुंतवणूक गुणक   क) रोजगार गुणक    ड) उपभोग गुणक

35) गुणकाचा आकार……….वरून निश्चित होतो.

अ) सरासरी उपभोग प्रवृत्ती    ब) सीमांत उपभोग प्रवृत्ती   क) सरासरी बचत प्रवृत्ती    ड) सीमांत बचत प्रवृत्ती

प्रा. अनिल सुतार
अर्थशास्त्र विभाग
महिला महाविद्यालय कराड